# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


प्रेसनोट २७९ - २२ दिनांक १५/०९/२०२२

## इलेक्ट्रीक बिल भरण्यासाठी Link पाठवून त्याद्वारे फसवणूक केलेली रक्कम परत मिळविण्यास सायबर गुन्हे शाखेस यश

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरारोड परिसरात राहणाऱ्या महिलेस अनोळखी इसमाने त्यांच्या मोबाईल फोनवर संर्पक करुन तुमचे इलेक्ट्रीक बिल भरण्याचे बाकी आहे तात्कळ बिल न भरल्यास तुमचा विजपुरवठा खंडीत करण्यात येईल असे सांगून तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईलवर बिल भरणा करण्याची लिंक पाठविली. सदर लिंकवर तक्रारदार यांनी क्लिक केल्यानंतर तक्रारदार यांच्या खात्यातून ९९,५१०/- रुपये रक्कम काढून घेण्यात आली. सदरचा तक्रार अर्ज सायबर गुन्हे शाखा येथे प्राप्त झाला होता.

सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार यांचे खाते असलेल्या बँकेकडून झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली व त्याअनुषंगाने तक्रारदार यांची फसवणूक झालेली रक्कम ही लुडो सुप्रिमच्या माध्यमातून पूढे वळती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आल्याने लुडो सुप्रीम कंपनीस पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम थांबविण्यात आली व फसवणूक रक्कमेपैकी ५०,५००/- रुपये रक्कम पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अशा प्रकारे फसव्या कॉलला उत्तर देवू नका.**
- **कॉल आलेल्या व्यक्तीकडे आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.**
- **कोणत्याही अनोळखी कॉल आल्यास त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.**
- **कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करु नका.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति.कार्यभार पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.अं.माधूरी धिंडे, सुवर्णा माळी, म.सु.ब. सुरज बोरसे यांनी केलेली आहे.

**----0000---**